नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/12/2022 (रविवार) दुपार

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर माळेगाव शिवार नागपूर सावनेर रोड येथे दिनांक १०/१२/२०२२ चे १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– श्री. धनराज मुरलीधर चांदूरकर, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, माळेगाव ता. सावनेर याची पत्नी मृतक नामे–चित्रा धनराज चांदुरकर, वय ४० वर्ष, रा. माळेगाव ही माळेगाव शिवारातुन माळेगाव येथे घरी येत असता माळेगाव चौकात नागपूर कडून सावनेर कडे जाणाऱ्या बजाज कंपनीच्या मोटरसायकल क्र. एम. एच.–३१/एफ. के–६२७८ चा चालक आरोपी नामे–करमविर राजदेव प्रजापती, वय ३१ वर्ष, रा. डब्लु. सी. एल. कॉलनी, सावनेर याने आपल्या ताब्यातील मोटर सायकल भरधाव वेगाने व हयगयीने रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे चालवून फिर्यादीची पत्नी चित्रा हिचा गंभीर अपघात करून तिचे मरणास व स्वत:चे दुखापतीस कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावेनर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक इसमाईल शेख मो. नं. ९४२३६०३१७५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर